## करडांचे संगोपन



नवीन जन्मलेल्या करडाला एक तासाच्या आत चिक पाजावा. करडांना त्यांच्या वजनाच्या १० टक्के दूध दिवसातून दोनदा विभागून पाजावे. नवजात करडांची नाळ कापण्यासाठी स्वच्छ कात्री किंवा ब्लेडचा वापर करावा, करडे १० ते १२ दिवसांची असताना त्यांना हिरवा चारा थोडा सुकवून व कोरडा चारा द्यायला सुरुवात करावी.

करडांना हगवण लागल्यास पुशवैद्यकाच्या सल्ल्याने औषधोपचार करावा. करडांची निकोप वाढ होण्यासाठी प्रत्येक दोन महिन्यांनी नियमितपणे जंतनाशके पाजावित. करडे शेळ्यापासून २ ते ३ महिन्यांनंतर वेगळी ठेवावीत. मांसासाठी ठेवलेल्या करडांच्या जादा वाढीसाठी पोषक खुराक द्यावा. सहा महिने वयानंतर नर व मादी करडे वेगळे ठेवावीत.

## पैदाशीच्या शेळीची निवड :

पैदाशीसाठी शेळी निवडताना तिच्यामध्ये जातीची सर्व लक्षणे बरोबर असावीत. पाठ मानेपासून शेपटापर्यंत शक्यतो सरळ असावी, बाक नसावा. पाठीमागून पाहिल्यावर मांड्यात भरपूर अंतर असावे. योनीमार्ग स्वच्छ असावा. कास मोठी लुसलुशीत, दोन्ही सड एकाच लांबीचे आणि जाडीचे, दूध काढल्यावर लहान होणारे असावेत. नियमितपणे माजावर येणारी, न उलटणारी, सशक्त, निरोगी, जुळी पिल्ले देणारी, जास्त दूध देणारी, स्वत:च्या करडाविषयी मात्रत्वभावना असणारी शेळी निवडावी.

## पैदाशीसाठी नराची निवड :



पैदाशीचा नर निवडताना तो जुळा किंवा तीळ्यातील जन्मलेला असावा. नराचे वृषण मोठे, दोन भाग असणारे व लोंबकळणारे असावे. पाय मजबूत आणि खुर उंच असावेत. चारही पायात चांगली चाल असावी. नर एक वर्ष वयाचा असेल तर २० शेळ्यासाठी, १ ते २ वर्ष वयाचा असेल तर ३५ शेळ्यासाठी आणि २ वर्षावरील असेल तर ४० शेळ्यासाठी वापरता येतो. २-३ वर्षाच्या अंतराने पैदाशीचा नर बदलणे आवश्यक असते. नरांना सतत शेळ्यांमध्ये ठेवू नये. पैदाशीच्या काळात नरांना जादा खुराक द्यावा.

## पैदाशीचा हंगाम :

माजाच्या हंगामामध्ये शेळी दर १९-२१ दिवसांनी माजावर येते. पैदाशीचे ५०% गुण शेळीकडून आणि ५०% गुण बोकडाकडून येतात. शेळी वर्षभर केव्हाही फळू शकते. सर्वसाधारणपणे शेळ्या पावसाळ्यात जुलै-ऑगस्ट महिन्यात, हिवाळ्यात ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात आणि उन्हाळ्यात मार्च-एप्रिल महिन्यामध्ये फळतात. मात्र चारा उपलब्धतेच्या अनुकूल हंगामातच जास्तीत जास्त शेळ्या गाभण राहतात. त्या दृष्टीने जून-जुलै व ऑक्टोबर-नोव्हेंबर हे हंगाम फलदायी ठरतात.

## आरोग्य :

शेळ्यांची तब्येत वर्षभर चांगली व तरतरीत राहण्यासाठी जंतनाशक व लसीकरणाचा कार्यक्रम राबवावा.

### शेळी/मेंढीसाठी जंत (कृमी) नाशक औषधी पाजण्याचे (डीवर्मिंग) वेळापत्रक

| | |
|---|---|
| राऊंडवर्म (गोलकृमीसाठी) | ❊ प्रथम मात्रा करडू १ महिन्याचे झाल्यावर द्यावी<br>❊ नंतर महिन्यातून एकदा सहा महिन्यापर्यंत, त्यानंतर वर्षातून तीन वेळा जून, ऑक्टोबर, व मार्च मध्ये द्यावे. |
| लिव्हरफ्लूक (पर्णकृमीसाठी) | वर्षातून दोन वेळा मे व ऑक्टोबरमध्ये प्रादुर्भावीत भागात. |
| टेपवर्म (पट्टकृमीसाठी) | वर्षातून दोन वेळेस जानेवारी व जून महिन्यात, कोकरात व करडात प्रादुर्भावीत भागात. |
| रक्ती हगवण : कॉक्सिडीओसीस | शेळ्या/मेंढ्याच्या कोकरानी माती चाटावयास सुरुवात केल्या-बरोबर औषधाची मात्रा द्यावी.<br>(साधारणपणे वयाच्या १५ व्या दिवसानंतर) |

### जंतनाशनासाठी वापरावयाची औषधे :

| | |
|---|---|
| राऊंडवर्म (गोलकृमीसाठी) | क्लोसॅटल, आयव्हमेक्टीन, अलबेन्ड्याझोल, मोरॅन्टल सीट्रेट, फेनबेन्ड्याझोल, मेबेन्ड्याझोल ई. |
| लिव्हरफ्लूक (पर्णकृमीसाठी) | ऑक्सिक्लोझॅनाईड, क्लोसॅटल, रॅफॉक्सेनाइड ई. |
| टेपवर्म (पट्टकृमीसाठी) | प्राझीक्वान्टेल, निक्लोसॅमाईड, क्लोसॅटल ई. |
| रक्ती हगवण : कॉक्सिडीओसीस | सल्फाडीमीडीन, अम्प्रोसोल ई. |
| वरील सर्व औषधे वजनाप्रमाणे पशुवैद्यकाच्या सल्ल्याने तोंडातून पाजावयाची आहेत. | |

### लसीकरणाचा वार्षिक कार्यक्रम :

| अ.क्र. | रोगाचे नाव | पहिले लसीकरण | नियमित लसीकरण |
|---|---|---|---|
| | सध्या उपलब्ध असलेल्यांपैकी नियमित टोचावयाच्या लसी | | |
| १. | आंत्रविषार | चार महिने आणि त्यावरील जर आईला लसीकरण केले असेल तर पहिला आठवडा- जर आईला लसीकरण केले नसेल तर | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी (मे-जून) बुस्टर डोस - लसीकरण केल्यानंतर १५ दिवसांनी |
| २. | घटसर्प | सहा महिने आणि त्यावरील | दरवर्षी पावसाळ्याच्या सुरवातीला (मार्च - एप्रिल) |
| | दर ३ वर्षातून एकदा टोचावयाची लस | | |
| ३. | पी.पी.आर. | तीन महिने आणि त्यावरील | प्रत्येक ३ वर्षाला (एप्रिल-मे) |
| | आसपासच्या भागात प्रादुर्भाव असेल तरच टोचावयाच्या लसी | | |
| ४. | फऱ्या | सहा महिने आणि त्यावरील | दरवर्षी पावसाळ्याच्या सुरवातीला (जून-जुलै) |
| ५. | लाळ्या-खुरकूत | चार महिने आणि त्यावरील | वर्षातून दोनदा (फेब्रुवारी व पुन्हा नोव्हेंबर) |
| ६. | फाशी (काळपुळी) | सहा महिने आणि त्यावरील | दरवर्षी (फेब्रुवारी) रोगग्रस्त भागात |
| ७. | शेळ्यातील देवी | तीन महिने | दरवर्षी (डिसेंबर) |

केव्हीके/घडिपत्रिका-२/२०२०

# मांसोत्पादनासाठी सर्वोत्तम उस्मानाबादी शेळी





◦ लेखन व संकलन ◦
डॉ. शरद साळुंके
कार्यक्रम सहाय्यक (पशुविज्ञान)

◦ प्रकाशक ◦
डॉ. सचिन डिग्रसे
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत
मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट, संचलित
कृषि विज्ञान केंद्र, लातूर
अति. एम.आय.डी.सी., पी - १६०, बार्शी रोड,
हरंगुळ (बु.), लातूर -४१३ ५३१
फोन नं. ०२३८२-२६७४११, ९४०४९५७५१७

## मांसोत्पादनासाठी सर्वोत्तम : उस्मानाबाद शेळी

शेळीपालन अनेक वर्षापासून दुर्लक्षित असलेला व केवळ एक पारंपारिक उद्योग म्हणून जोपासलेला व ग्रामीण पातळीवर सिमीत न राहता एक बहुउद्देशीय व्यवसाय म्हणून विकसीत होत आहे. शेळी पालनात रोज नवनवीन संकल्पना, जाती, व्यवस्थापनाच्या पद्धती आभ्यासल्या जात आहेत. शेळीपालन व्यवसाय कमी खर्चाचा, कमी जागा लागणारा, कमी धोक्याचा व जास्तीत जास्त फायदेशीर कसा होईल याकडे शेळीपालक लक्ष पुरवू लागले आहेत. म्हणूनच या व्यवसायाची शास्त्रीयदृष्ट्या व्यवस्थापन पद्धती समजून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात शेळीपालन व्यवसाय हा मुख्यत्वे मांसोत्पादनासाठीच केला जातो. आपल्या देशात असणाऱ्या एकूण २०-२२ जाती पैकी उस्मानाबादी शेळीची मांसोत्पादनासाठी उत्कृष्ठ असणाऱ्या निवडक शेळ्यांमध्ये गणना होते. कारण या जातीचे मांस कमी चरबी असणारे व चविष्ठ आहे.

भारताच्या आर्थिक उलाढालीमध्ये शेळी पालन व्यवसायाला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. आपल्या देशात उत्तरप्रदेश, राजस्थान, गुजरात व महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने शेळ-यांची संख्या जास्त आढळते. विशेषत: दुष्काळी किंवा कमी पावसाच्यया प्रदेशात शेळी पालनाला विशेष प्राधान्य असल्याचे आढळून येते. दरवर्षी सुमारे ३५ ते ४० टक्के शेळ्यांची मांसासाठी कत्तल केली जाते, असे असून देखील या शेळ्यांची संख्या देशपातळीवर दरवर्षी ४ ते ५ टक्क्यांनी वाढत आहे. मात्र महाराष्ट्रात शेळ्यांच्या संख्येत घट दिसून येते.

शेळ्यांच्या मांसाला बाजारात चांगली मागणी आहे, शिवाय मांसाचे दरही सतत वाढत आहेत. शेळ्यांची खरेदी व खाद्यासाठी होणारा कमी भांडवली खर्च, मृत्यूचे कमी प्रमाण यामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच इतर व्यावसायिक शेळी पालनाकडे आकर्षित होऊ लागले आहेत.

सर्वसाधारण महाराष्ट्रात प्रत्येक शेतकऱ्याकडे ४ ते ५ शेळ्या असतात. सामान्यत: त्यांचे संगोपन पारंपारिक पद्धतीने केले जाते. कोणत्याही सुधारित तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. उस्मानाबादी शेळ्यांची पैदास मुख्यत्वे महाराष्ट्रातील उस्मानाबाद, लातूर, बीड, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यात केली जाते.

### उस्मानाबादी शेळ्यांची वैशिष्ट्ये :

#### बाह्य शरीर गुणधर्म

- रंग : काळा
- त्वचा : करडी
- कान : लोंगते, काही शेळ्यांत कानावर पांढरे ठिपके आढळतात त्यांना मोरकानी म्हणतात.
- शिंगे : मागे वळलेली
- कपाळ : बहिर्वक्र
- खांद्यापर्यंत उंची : ६५ ते ७० से.मी.
- छातीचा घेर : ६५ ते ६७ से.मी.
- शरीराची लांबी : ६४ ते ६५ से.मी.



## शरीर वाढ क्षमता :

| वय | | सरासरी वजन (किलो) |
|---|---|---|
| ➤ जन्मत करडाचे वजन | : | १.८५ |
| ➤ तीन महिने वयाच्या करडांचे वजन | : | ७.६९ |
| ➤ सहा महिने वयाच्या करडांचे वजन | : | १४.०८ |
| ➤ बारा महिने वयाच्या करडांचे वजन | : | १८.६२ |
| ➤ पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे वजन | : | ३२ |

## प्रजनन क्षमता :

| | | |
|---|---|---|
| ➤ प्रथम माजावर येण्याचे वय | : | ७ ते ८ महिने |
| ➤ प्रथम गर्भधारणेच्या वेळेचे वय | : | ८ ते ९ महिने |
| ➤ प्रथम विताचे वय | : | १३ ते १४ महिने |
| ➤ दोन विातातील अंतर | : | ७ ते ८ महिने |
| ➤ गाभण काळ | : | ५ महिने |
| ➤ प्रथम गर्भधारणेच्या वेळी वजन | : | १७ ते १८ किलो |
| ➤ प्रथम वेतीचे वेळी वजन | : | २४ ते २५ किलो |
| ➤ माजाचा कालावधी | : | ३४ ते ३६ तास |
| ➤ जुळ्या करडांचे प्रमाण | : | ६५ ते ७० टक्के |
| ➤ तिळ्या करडांचे प्रमाण | : | १० टक्के |



## मांसोत्पादन क्षमता :

| तपशील | वय (महिने) | |
|---|---|---|
| | ६ | १२ |
| कत्तल करतेवेळी वजन (किलो) | १४.१६ | २३.३० |
| खाण्यायोग्य मांस | ४९.३० | ५०.० |

## किफायशीर शेळीपालन तंत्रज्ञान

### शेळ्यांसाठी गोठे

**गोळ्यांची दिशा :** पूर्व-पश्चिम असावी.

**जमीन :** मुरमाड व उंचवट्याची, गोळ्यातील मुरमाचा थर वर्षातून एकदा बदलावा, महिन्यातून एकदा चुना टाकावा.

**छप्पर :** उपलब्ध लाकडी बल्ल्या, बांबू, पाचट, तुराटी, भाताचा पेंढा ई. साधन सामुग्रीचा वापर करावा.

### प्रती शेळी गोठ्यातील जागा :



१५ चौ. फूट छप्परयुक्त व ३० चौ. फूट फिरण्यासाठी. शक्यतो गोठ्या-भोवती कुंपण असावे. तसेच आजु-बाजूला झाडे, झुडपे लावावीत. गोठ्यात शेळ्या, बोकड व करडे व्यवस्थापनाच्या दृष्टीने वेगळी ठेवावीत.

### शेळ्यांचा आहार :



शेळ्यांना हिरव्या व कोरड्या चाऱ्याची गरज असते. शेळ्यांना अर्ध बंदिस्त गोठा पद्धतीत दिवसभरासाठी २ ते ३ किलो लसून घास, बरसीम, मका, ज्वारी ई. सारखा हिरवा चारा तसेच ०.५० ते ०.७५ किलो कोरडा चारा द्यावा. कोरड्या चाऱ्यामध्ये ज्वारीचा कडबा, भुईमुगाचा पाला, तुरभूसा, हरभरा काड ई. समावेश करावा.

चारा दिवसातून वेगवेगळ्या वेळी थोडा थोडा द्यावा. शेळ्यांना गुटगुटीत व वजनदार करडे मिळण्यासाठी गाभण काळातील शेवटचा ६ ते ८ आठवडे जादा खुराक व सकस चारा द्यावा. तसेच पैदास हंगामापूर्वी दोन ते तीन आठवडे ३०० ते ३५० ग्रॅम जादा खुराक द्यावा. म्हणजे जुळ्या करड्यांचे प्रमाण वाढते.

### शेळ्याना लागणारा आहार

| गटाचे विवरण | हिरवा चारा (किलो) | वाळलेला चारा (किलो) | खुराक (ग्रॅम) | चराई तास |
|---|---|---|---|---|
| पूर्णपणे ठाणबंद | ३-४ | ०.५-१ | २५०-३०० | - |
| अंशत: ठाणबंद | २-३ | ०.५ | २००-३०० | ४ |
| पैदाशीचे बोकड (पैदाशीच्या हंगामात) | ३-५ | ०.५-१ | ४०० | - |
| गाभण शेळ्या(शेवटचे दीड महिने) | ३-५ | ०.५-१ | ३००-४०० | २-४ |
| व्यालेल्या शेळ्या (व्याल्यानंतर १ महिना) | ३-५ | ०.५-१ | ३००-४०० | २-४ |